| CNR No.MHWR040008592025 | नोंदणी तारिख | १६/०५/२०२५ |
|---|---|---|
| | दाखल तारिख | १६/०५/२०२५ |
| | निकाल तारिख | ०६/०५/२०२६ |
| | कालावधी | ०० वर्षे, ११ म, २० दि. |

# न्यायनिर्णय

(घोषीत दिनांकः ०६/०५/२०२६)

आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई), ७७(अ) अन्वये अपराधाच्या आरोपासाठी सदरचा खटला करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता यांचा तसेच आरोपीतर्फे विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रकरणाच्या न्यायनिर्णयाकरिता माझ्या समक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने सिद्ध केले काय की, दिनांक १७/११/२०२४ रोजी वेळ २०.३० ते २१.०० वाजताचे सुमारास कृषी उत्पन्न बाजार समिती, सेलू, तालुका–सेलू व जिल्हा–वर्धा, येथे आरोपीच्या ताब्यातून ऑफिसर चॉईस कंपनीच्या १८० एम.एल.च्या २० निपा अवैधरित्या विनापरवाना जवळ बाळगतांना मिळुन आला तसेच दारुबंदी अधिका–याने परवान्याची मागणी केली असता परवाना आरोपीने सादर केला नाही, म्हणून आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई), ७७(अ) अन्वये गून्हा केला | : | नकारार्थी |

| | | | |
|---|---|---|---|
| | आहे ? | | |
| २. | कोणता आदेश ? | : | **आरोपी निर्दोषमुक्त.** |

## :: कारणमीमांसा ::

३. अभियोग पक्षाने आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी पंच साक्षीदार विवेक हरिभाऊ शेंडे यांची साक्ष निशाणी क्र.०६ पुढे नोंदविली. पुरेशी संधी देवुनही इतर साक्षीदारांना उपस्थित ठेवण्यात अभियोगपक्षाला यश आले नाही. त्यामुळे निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करून अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. खटला चालवित असतांना आरोपीविरूध्द गुन्ह्या संदर्भात कोणतीही विधाने आलेली नसल्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविण्यात आली नाही.

**मुद्दा क्र.१ बाबत** :

४. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई), ७७(अ) प्रमाणे आरोप सिध्द करण्यासाठी आरोपी हा स्वतःच्या फायदयासाठी अथवा विक्रीसाठी दारु अवैधरित्या विनापरवाना जवळ बाळगतांना मिळून आला तसेच दारुबंदी अधिका–याने परवान्याची मागणी केली असता परवाना आरोपीने सादर केला नाही, ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे.

५. त्या अनुषंगाने अभियोगपक्षाने मौकाजप्ती पंच साक्षीदार क्रमांक १ विवेक हरिभाऊ शेंडे यांची साक्ष निशाणी क्र.०६ पुढे नोंदविली. सदर साक्षीदार मौकाजप्तीपंच साक्षीदार असून त्यांच्या साक्षीप्रमाणे दिनांक १७/११/२०२४ रोजी पोलिसांनी त्यांना पंच म्हणून कुठेही बोलविले नाही. पोलीसांनी त्यांच्या समक्ष काहीही कार्यवाही केली नाही. पोलीसांनी त्यांच्या समक्ष काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी त्यांची एका लिहिलेल्या कागदावर सही घेतली. त्यांना सदरचा

मौकाजप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यांनी पंचनाम्यावरील त्यांच्या सह्या ओळखल्या त्यावरील मजकूराबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे कथन केले. म्हणून विद्वान सरकारी वकिलांनी त्यांना परवानगीनंतर उत्तर सूचक प्रश्न विचारले असता त्यांनी नाकारले की, दिनांक १७/११/२०२४ रोजी पोलिसांनी त्यांना कृषी उत्पन्न बाजार समिती समोरील पानठेल्याचा मागे, सेलू, तालुका–सेलू व जिल्हा–वर्धा येथे पंच म्हणून बोलविले व त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातून ऑफिसर चॉईस कंपनीच्या १८० मि.लि.च्या २० निपा जप्त करून पंचनामा तयार केला होता. पोलीसांनी मौकाजप्ती पंचनामा घटनास्थळावर तयार केला व त्यावर त्यांनी वाचुन व समजुन सही केली होती. जप्त मालापैकी एक १८० एम.एल.ची शिशी सी.ए. परिक्षणाकरिता नमुना काढुन घेतली व त्यावर त्यांची, दुसरा पंच, आरोपी व पोलीसांच्या सहीने लाखेने डबल सिल केले.

६. प्रस्तूत प्रकरणात अभियोगपक्षाने फिर्यादी व तपासी अंमलदार यांना तपासले नाही. अभियोगपक्षाने मौकाजप्ती पंचनामा सिध्द करण्याकरीता मौकाजप्ती पंच साक्षीदार तपासले, परंतु तपासण्यात आलेल्या मौकाजप्ती पंचानी परस्पर विरोधी जबाब दिला व सरकारी वकिलांनी घेतलेल्या उलटतपासामध्ये ही आरोपीला गुंतविण्यासाठी काहीही सांगितले नाही. त्यामुळे मौकाजप्ती पंचनामा सिध्द झालेला नाही. अशा परिस्थितीत घटनास्थळावरुन पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातून ऑफिसर चॉईस कंपनीच्या १८० एम.एल.च्या २० निपा अवैधरित्या विनापरवाना जप्त केली, ही बाब सिध्द झाली नाही. जरीही अभियोग पक्षातर्फे रासायनिक तज्ञाचा अहवाल अभिलेखावर सादर करण्यात आला, परंतु त्या अनुषंगाने कुठलाही पुरावा उपलब्ध केला नाही.

७. त्यामुळे अभिलेखावरील एकदंरीत पुराव्याचे अवलोकन करता अभियोग पक्षाने आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई), ७७(अ) अन्वये गुन्हा

केल्याचे सिध्द केले नाही. त्यामुळे आरोपीला संशयाचा फायदा देऊन मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी नोंदविते.

**मुद्दा क्र.२ बाबत :**

८. वरील मुद्दांचा नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपी हा त्याच्यावर ठेवलेल्या आरोपामधून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्याकरिता आदेश करण्यात आलेला नाही. वरील सर्व कारणाचा विचार करता, मी मुद्दा क्र.२ च्या निष्कर्षात, खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी नामे **दिपक डालीकराम बिसेन** याची महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलम ६५(ई), ७७(अ) च्या गुन्ह्यातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१)] अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे वैयक्तीक बंधपत्रक रद्द करण्यात येते.

**३.** अपराध क्र.९६०/२०२४ मध्ये भरलेली सुरक्षा राशी रक्कम जर असेल तर आरोपीला अपिल कालावधी संपल्यानंतर परत करण्यात यावी.

**४.** आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ] प्रमाणे रु.१५,०००/– किंमतीचा वैयक्तीक जात मुचलका सादर करावा.

**५.** अपराध क्र.९६०/२०२४ मधील जप्त मुद्देमाल ऑफिसर चॉईस कंपनीच्या १८० एम.एल.च्या २० निपा अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग, वर्धा यांच्याकडे कायदेशीर

विल्हेवाटीकरिता पाठविण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.05.06 16:57:56 +0530

**<u>दिनांक</u>** : ०६/०५/२०२६

( एस.आर.सातभाई )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)